# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०९.०७.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०८.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ३३,४५,६५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ०३ इसमावर कारवाई करुन ३,२९०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३८८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८५,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०२ गुन्हे उघडकीस.**

पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. ३०, स्नेहदीप कॉलनी, हनुमान मंदीरसमोर, जरीपटका येथे राहणारे फिर्यादी स्नेहल उल्हास शेंडे वय ३६ वर्ष हे पंजाब नॅशनल बॅक, मुंबई येथे नेमणूकीस असल्याने ते मुंबई येथे हल्ली मुक्कामी असतात. त्यांचे वडील, पत्नी व मुले हे जरीपटका येथील घरी राहतात. फिर्यादीचे मुलांना सुटया असल्याने फिर्यादीची पत्नी, वडील व मुले हे आपले राहते घराला कुलुप लावुन फिर्यादी यांचेकडे मुंबई येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने दिनांक २२.०६.२०२६ चे ०२.५८ वा. ते ०३.१७ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील रोख ५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने आणि मोबाईल फोन असा एकुण किंमती ३,८२,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता, फिर्यादी यांना दिसून आले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी यास निष्पन्न केले. आरोपी नामे सुमित गणपत मेश्राम वय १९ वर्षे रा. नारा गाव, हनुमान मंदीरजवळ, जरीपटका, नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीची विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचे एका साथीदार पाहिजे आरोपी याचे सह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे कळमणा हद्दीतून वाहनचोरीचा गुन्हा असे एकुण ०२ चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु, एक

पल्सर मोटार सायकल, एक मोबाईल फोन व सोन्याचे दागिने असा एकुण १,४५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, पोउपनि राहुल रोटे, पोअं. निलेश श्रीपात्रे, प्रफुल्ल पारधी, विरेंद्र पांडे व हंसराज ठाकूर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे लकडगंज:— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०९.०७.२०२६ चे ०३.१५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असता, जगजीवनराम नगर, हनुमान मंदीसमोर, गरोबा मैदान येथे एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यास हटकले असता, तो इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहन उर्फ येडा सतिश रंगारी वय २७ वर्षे, रा. शिलगंध बुध्द विहारजवळ, कुंभारटोली, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत, कंबरेमध्ये एक लोखंडी चाकु मिळून आल्याने किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी भास्कर गुलाबराव बारापात्रे वय ५५ वर्षे, रा. आदर्शनगर कॉलनी, तांडापेठ, पाचपावली, नागपूर यांना प्लॉट खरेदी करायचा होता. फिर्यादी यांनी आरोपी क्र. १) अमोल मधुकर मोकाशी रा. प्लॉट क्र. ६३, सचना सोसायटी, मनिषनगर, बेलतरोडी यांचे मार्फतीने आरोपी क्र. २) सौ. ममता विनायकराव रायदास रा. गली क्र. ०७, चंद्रमणीनगर, अजनी, नागपूर यांचे मालकीचा मौजा बेसा, पहन ३८, खसरा क्र. ६६ मधील अखिल विश्वभारती को—ऑपरेटीव्ह सोसायटी येथील प्लॉट क्र. १३७ चे खरेदीचा सौदा १३ लाख रुपयांमध्ये केला व दिनांक ०१.०३.२०१६ रोजी दुय्यम निबंधक वर्ग क्र. २, नागपूर क्र. ७ येथे आरोपी क्र. २ ने फिर्यादीस रजिस्ट्री

करुन दिली होती. फिर्यादी यांनी सन २०१६ ते २०२५ पावेतो नगर पंचायत बेसा पिपळा येथे प्लॉटचा टॅक्स भरलेला होता. दिनांक १०.०८.२०२६ रोजी फिर्यादी प्लॉट बघण्याकरीता गेले असता, त्यांचे प्लॉटवर निखित तिडके नावाचे व्यक्तिचा बोर्ड लागलेला दिसला. फिर्यादी यांनी त्यांना फोन करुन विचारले असता, त्यांनी नमुद प्लॉट अखिल विश्वभारती को–ऑपरेटीव्ह सोसायटी चे अध्यक्ष आबिद भाई यांचेकडून घेतल्याचे सांगितले. फिर्यादी यांनी रजिस्ट्री कार्यालयातून प्रमाणित प्रत काढून प्लॉटचे कागदपत्रांची पडताळणी केली असता, आरोपी क्र. १ व २ यांनी दिलेले प्लॉटची कागदपत्रे खोटे असल्याचे दिसून आले. आरोपी यांनी कट रचून बनावट कागदपत्रे खरी आहेत असे भासवून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडून १३ लाख रुपये घेऊन रजिस्टर ऑफीसमध्ये प्लॉटची रजिस्ट्री करुन देऊन, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन आर्थिक फसवणूक केली.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. श्रीकांत गोरडे ८३९०८७१७४२ यांनी आरोपींविरूध्द कलम १२०(ब),४०६,४२०,४६७,४७१,४७२ भा.दं. वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :–** दिनांक ०८.०७.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, नागपूर–कलकत्ता रेल्वे लाईन, पोल क्र. ११२५/२अ जवळ चिखली पुलाखाली एक अनोळखी इसम वय अंदाजे ६० ते ६५ वर्ष वयाचे, रेल्वेचा धडक लागल्याने पटरीचे मधोमध जखमी अवस्थेत मिळून आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी पोलीस अंमलदार चरणसिंग विजेंद्रसिंग वय ३५ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि बुंदे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**